# सायबर जागरूकता दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सायबर जागरुकता दिनानिमित्त शपथ घेण्यात आली व सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्यात सामंजस्य करार झाला असून, त्या अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. विद्यापीठात सुरू असलेल्या रासेयो शिबिरात सायबर जागरुकता दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. संगणकशास्त्र प्रशाळेत अन्य सत्रात संचालक प्रा. एस. आर. कोल्हे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसाठी रिडल स्पर्धा, डिजिटल पोस्टर्स हे उपक्रम घेण्यात आले.



विद्यापीठात सायबर जागरुकता दिनानिमित्त शपथ घेताना रवींद्र पाटील, प्रा. एस. टी. इंगळे, डॉ. विनोद पाटील, प्रा. व्ही. एल. माहेश्वर व मान्यवर.